दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

### आजचे पंचांग

दिनांक : ६ ऑगस्ट २०२६ वार : गुरुवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : अष्टमी तिथी (सायंकाळी ०६:५२ पर्यंत) त्यानंतर नवमी तिथी नक्षत्र : भरणी नक्षत्र (रात्री ०८:१३ पर्यंत) त्यानंतर कृत्तिका नक्षत्र योग : गण्ड योग (दुपारी ०३:०० पर्यंत) त्यानंतर वृद्धि योग करण : बलवा करण (सकाळी ०७:५० पर्यंत) त्यानंतर कौलव करण

### 'आरटीई' प्रवेशांचा यंदा उच्चांक

**पुणे :** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) राज्यातील खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेत यंदा उच्चांकी प्रवेश झाले आहेत. एकूण पाच फेऱ्यांतून ९६ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा आरटीईअंतर्गत प्रवेशित विद्यार्थी आठ हजारांनी वाढल्याचे स्पष्ट झाले असून, सुमारे १७ हजार जागा रिक्त राहिल्या आहेत.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. ६ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३०९ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### सारांश वृत्त

**न्यायालयाच्या उंबरठ्यावरच मतभेद! विद्यार्थी आंदोलनाच्या समर्थनावर सर्वोच्च न्यायालयातील वकिलांमध्येच संघर्ष; न्यायालयाचा लोकशाही प्रक्रियेवर भर**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या वकील संघटनेने विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा दर्शवणारा ठराव मंजूर केल्यानंतर न्यायालयाच्या परिसरातच अभूतपूर्व वाद निर्माण झाला आहे. या ठरावाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावत, वकील संघटनांच्या लोकशाही प्रक्रियेत न्यायालय हस्तक्षेप करणार नसल्याचे स्पष्ट केले.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, बार असोसिएशनच्या मतप्रदर्शनात न्यायालयाने हस्तक्षेप केला, तर तो अत्यंत धोकादायक पायंडा ठरेल. कोणाला ठरावाशी असहमती असल्यास, त्यांनी संघटनेच्या नियमांनुसार सर्वसाधारण सभेची मागणी करून लोकशाही मार्गाने आपली भूमिका मांडावी.

या प्रकरणाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च संस्थेशी संबंधित वकील संघटनेतच विद्यार्थी आंदोलनावरून दोन स्पष्ट मतप्रवाह समोर आले आहेत.

एका बाजूला आंदोलनाला नैतिक पाठिंबा देणारे वकील, तर दुसऱ्या बाजूला अशा राजकीय स्वरूपाच्या ठरावाला विरोध करणारे सदस्य, अशी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे.

न्यायालयाने या वादाचा निकाल देण्याऐवजी लोकशाही प्रक्रियेवर विश्वास व्यक्त करत, मतभेदांचे उत्तर न्यायालय नव्हे, तर संघटनेतील लोकशाही आहे,

असा स्पष्ट संदेश दिला. या निर्णयामुळे बार असोसिएशनचे स्वातंत्र्य, अंतर्गत लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य याबाबत महत्त्वाचे घटनात्मक तत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# 'आमदार नव्हे, पक्षच सर्वोच्च!' सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण मौखिक निरीक्षण

## शिवसेना प्रकरणात उद्धव ठाकरे गटाच्या युक्तिवादाला मोठा नैतिक आधार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

शिवसेना पक्षातील फूट, पक्षचिन्ह आणि आमदारांच्या अपात्रतेशी संबंधित बहुचर्चित प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी अत्यंत महत्त्वपूर्ण मौखिक निरीक्षण नोंदवले. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान असे नमूद केले की, सध्याच्या कायद्यानुसार विधिमंडळ पक्षावर राजकीय पक्षाचे नियंत्रण कायम असते आणि राजकीय पक्षाचा निर्णय हा केवळ विधिमंडळ पक्षातील बहुमताच्या इच्छेपेक्षा वरचढ ठरतो.

हे निरीक्षण उद्धव ठाकरे गटाचे नेते सुनील प्रभू यांनी दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान नोंदविण्यात आले. या याचिकेत महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांनी एकनाथ शिंदे गटातील आमदारांना दहाव्या अनुसूचीनुसार अपात्र ठरविण्यास नकार दिलेल्या निर्णयाला आव्हान देण्यात आले आहे. याचबरोबर उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे गटाला अधिकृत शिवसेना म्हणून दिलेली मान्यता आणि धनुष्यबाण चिन्ह बहाल करण्याच्या निर्णयालाही सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.



सुनावणीदरम्यान ज्येष्ठ विधिज्ञ घरळिश्र डळलरश्र यांनी असा युक्तिवाद केला की, भारतीय राज्यघटनेतील दहाव्या अनुसूचीनुसार आणि विद्यमान कायदेशीर चौकटीत राजकीय पक्षाची ओळख, धोरणे आणि अधिकृत निर्णय यांनाच सर्वोच्च स्थान आहे. त्यामुळे केवळ आमदारांची संख्या किंवा विधिमंडळ पक्षातील बहुमत याच्या आधारे पक्षाची अधिकृत भूमिका बदलू शकत नाही. त्यावर न्यायालयाने केलेले मौखिक निरीक्षण हे त्यांच्या या मांडणीशी सुसंगत असल्याचे दिसून आले.

तथापि, हे स्पष्टपणे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की न्यायालयाचे हे अंतिम निकाल किंवा निर्णय नाही. सुनावणीदरम्यान न्यायाधीशांकडून करण्यात आलेली मौखिक निरीक्षणे ही केवळ चर्चेचा भाग असतात. अंतिम निर्णय हा सर्व पक्षांचे युक्तिवाद, कायदेशीर तरतुदी आणि उपलब्ध पुरावे विचारात घेऊन राखीव किंवा घोषित केला जातो. त्यामुळे या निरीक्षणाला अंतिम न्यायनिवाडा मानणे योग्य ठरणार नाही.

तरीही, न्यायालयाने व्यक्त केलेली भूमिका ही उद्धव ठाकरे गटासाठी नैतिक आणि कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे. कारण या निरीक्षणामुळे राजकीय पक्ष सर्वोच्च की विधिमंडळ पक्ष? या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या वादाच्या केंद्रस्थानी असलेल्या प्रश्नावर न्यायालयाचा प्राथमिक दृष्टिकोन स्पष्ट झाल्याचे मानले जात आहे.

या प्रकरणाचा अंतिम निकाल केवळ शिवसेनेच्या भवितव्यावरच नव्हे, तर देशातील पक्षांतरविरोधी कायद्याची अंमलबजावणी, राजकीय पक्षांचे अंतर्गत अधिकार आणि भविष्यातील पक्षफुटीच्या प्रकरणांवरही दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो.

## 'गृहमंत्री विद्यार्थ्यांचे गुन्हेगार, म्हणूनच तोंड लपवत आहेत!' राहुल गांधींचा अमित शहांवर थेट हल्ला; संसदेत उत्तर देण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात जंतरमंतरवरील विद्यार्थी आंदोलन आणि आंदोलनकर्त्यांवरील कथित पोलिस कारवाईवरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर अत्यंत तीव्र शब्दांत हल्लाबोल करत, गृहमंत्री विद्यार्थ्यांचे गुन्हेगार आहेत, म्हणूनच ते तोंड लपवत आहेत, असा आरोप केला.

संसदेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी इंडिया आघाडीतील खासदारांनी संसद परिसरात महात्मा गांधी यांच्या पुतळ्यापासून मकर द्वारापर्यंत मोर्चा काढत केंद्र सरकारविरोधात जोरदार निदर्शने केली. या मोर्चात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, खासदार



प्रियंका गांधी आणि विविध विरोधी पक्षांचे नेते सहभागी झाले.

राहुल गांधी यांनी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमार आणि पॅलेट गनच्या वापराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले. विद्यार्थ्यांवर पॅलेट गन चालवण्याचे आदेश नेमके कोणी दिले? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित करत, या संपूर्ण प्रकरणावर गृहमंत्री अमित शहा यांनी स्वतः संसदेत उपस्थित राहून उत्तर द्यावे, अशी मागणी केली.

विरोधकांचा आरोप आहे की, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाकडे कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नाप्रमाणे पाहण्याऐवजी सरकारने दडपशाहीचा मार्ग स्वीकारला. दुसरीकडे, सरकारने या आरोपांवर अद्याप सविस्तर प्रतिक्रिया दिलेली नाही.

विद्यार्थी आंदोलन, कायदा-सुव्यवस्था आणि संसदेतील उत्तरदायित्व या मुद्द्यांवरून सरकार आणि विरोधक आमनेसामने आले असून, अधिवेशनाच्या अंतिम टप्प्यात हा संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत. संसदेत या विषयावर सरकार कोणती भूमिका मांडते आणि विरोधकांच्या मागण्यांना कसे उत्तर देते, याकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## धनंजय मुंडेंना तटकरेंचाच घरचा इशारा! 'नेत्याच्या पत्रकार परिषदेत मध्ये बोलणं योग्य नाही' म्हणत अप्रत्यक्ष कानउघाडणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये धनंजय मुंडे यांच्या भूमिकेवर आता पक्षातूनच प्रश्न उपस्थित होऊ लागल्याचे चित्र आहे. सुनेत्रा पवार यांच्या पत्रकार परिषदेदरम्यान एका पत्रकाराला प्रश्न विचारण्यापासून रोखल्याच्या वादावर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अप्रत्यक्षपणे नाराजी व्यक्त केली आहे. महत्त्वाच्या व्यक्तीच्या पत्रकार परिषदेत बाजूला बसणं योग्य आहे; मात्र बाजूला बसून बोलणं किंवा हस्तक्षेप करणं योग्य वाटत नाही, असे स्पष्ट मत तटकरेंनी व्यक्त केले.

तटकरेंनी सांगितले की, त्यांनी संबंधित पत्रकार परिषद पाहिलेली नसली तरी धनंजय मुंडे नेमक्या कोणत्या संदर्भात बोलले, हे ते समजून घेतील. मात्र त्यांच्या विधानातून मुंडे यांच्या वर्तनाबाबत पक्ष नेतृत्व समाधानी नसल्याचे संकेत मिळत आहेत.

हा वाद तेव्हा सुरू झाला, जेव्हा बीड दौऱ्यादरम्यान सुनेत्रा पवार यांच्या पत्रकार परिषदेत एका पत्रकाराने कायदा-सुव्यवस्थेबाबत प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी धनंजय मुंडे यांनी पत्रकाराला थांबवल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला. त्यानंतर काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्यावर आक्षेपार्ह शब्दांत टीका केली, ज्यावरून राज्यात मोठा राजकीय वाद निर्माण झाला.

आता विरोधकांनंतर स्वतःच्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांनीच सार्वजनिक रीत्या शिष्टाचार आणि पत्रकार परिषदेतील आचारसंहितेचा मुद्दा उपस्थित केल्याने, हा केवळ विरोधकांचा आरोप नसून पक्षांतर्गत नाराजीचाही संकेत मानला जात आहे.

## मोदींचा व्हिडिओ हटवण्याची मोठी किंमत? मेटाला संसदीय समितीचा तीन दिवसांचा अल्टिमेटम; 'कायदेशीर संरक्षण' काढून घेण्याचा इशारा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अधिकृत व्हिडिओ फेसबुकवरून हटविण्याच्या घटनेवरून केंद्र सरकार आणि मेटा यांच्यातील वाद अधिक तीव्र झाला आहे. लोकसभा सचिवालयामार्फत पाठविण्यात आलेल्या पत्रानुसार, संसदेच्या दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विषयक स्थायी समितीने मेटाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झुकरबर्ग यांना तीन दिवसांच्या आत सार्वजनिकरीत्या माफी मागण्याचा अल्टिमेटम दिला आहे. तसे न केल्यास भारतातील मेटाचे कायदेशीर संरक्षण काढून घेण्याची शिफारस करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा समितीने दिला आहे.

भारतीय जनता पक्षाचे खासदार निशिकांत दुबे यांच्या अध्यक्षतेखालील या समितीच्या मते, २३ जुलै रोजी युवकांच्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अधिकृत व्हिडिओ फेसबुकवरून चुकीच्या पद्धतीने हटविण्यात आला. ही केवळ तांत्रिक चूक नसून देशाच्या पंतप्रधानांच्या अधिकृत संवादात झालेला गंभीर हस्तक्षेप असल्याचे समितीचे मत आहे. त्यामुळे मेटाने केवळ स्पष्टीकरण देणे पुरेसे नसून देशाची माफी मागणे आवश्यक असल्याचे समितीने नमूद केले आहे. याच बैठकीत समितीने गुगल इंडियालाही आर्थिक फसवणुकीशी संबंधित प्रकरणांबाबत जाब विचारला. डिजिटल माध्यमांवर होणाऱ्या आर्थिक फसवणुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी तंत्रज्ञान कंपन्यांनी अधिक जबाबदारी स्वीकारावी, अशी भूमिका समितीने मांडली.

काय आहे 'कायदेशीर संरक्षण'? माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार सामाजिक माध्यम कंपन्यांना वापरकर्त्यांनी प्रकाशित केलेल्या मजकुरासाठी मर्यादित कायदेशीर संरक्षण मिळते. या संरक्षणामुळे प्रत्येक मजकुरासाठी कंपनीला थेट जबाबदार धरले जात नाही. मात्र हे संरक्षण काढून घेतल्यास संबंधित व्यासपीठावर प्रसिद्ध होणाऱ्या बेकायदेशीर किंवा आक्षेपार्ह मजकुराबाबत कंपनीलाही थेट कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

या प्रकरणामुळे भारत सरकार आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांमधील संबंध पुन्हा एकदा चर्चेत आले असून, देशातील डिजिटल व्यासपीठांची जबाबदारी, उत्तरदायित्व आणि भारतीय कायद्यांचे पालन या मुद्द्यांवर आता अधिक तीव्र चर्चा होण्याची शक्यता आहे.

## 'इन्फ्रा मॅन'ची प्रतिमा की उद्घाटनांचा फुगा? तीन वर्षांतच वाहून गेला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन झालेला पूल!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गडचिरोली । विशेष वृत्त**

महाराष्ट्रात विकासकामांचे श्रेय घेणाऱ्या आणि स्वतःला पायाभूत सुविधांच्या विकासाचा चेहरा म्हणून सादर करणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमेला गडचिरोलीतील एका पुलाच्या दुर्घटनेने मोठा धक्का बसला आहे. १५ ऑगस्ट २०२३ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या कोठी-कोरणार पुलाचा काही भाग अवघ्या तीन वर्षांतच वाहून गेला. परिणामी वाहतूक पूर्णपणे बंद झाली असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गुणवत्ता नियंत्रणावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेला आणि क्रांतिवीर बाबुराव शेडमाके यांच्या नावाने ओळखला जाणारा हा पूल इतक्या कमी कालावधीत निकामी होणे हे केवळ तांत्रिक अपयश मानायचे की सार्वजनिक निधीच्या वापरावर प्रश्नचिन्ह मानायचे, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

विकासाच्या नावावर मोठमोठ्या उद्घाटनांचे राजकारण केले जाते, पण त्या प्रकल्पांची गुणवत्ता, टिकाऊपणा आणि जबाबदारी कोणाची, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. उद्घाटनाच्या वेळी कॅमेऱ्यांचे फ्लॅश आणि घोषणांचा गजर असतो; मात्र पूल कोसळल्यानंतर उत्तरदायित्व स्वीकारण्यासाठी कोणी पुढे येत नाही, अशी टीका विरोधकांकडून केली जात आहे.

या घटनेमुळे घोषणांचा विकास आणि प्रत्यक्षात टिकणारा विकास यातील फरक पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनला आहे. आता नागरिकांची अपेक्षा केवळ नव्या उद्घाटनांची नाही, तर सुरक्षित, दर्जेदार आणि जबाबदारीने उभारलेल्या पायाभूत सुविधांची आहे.

## 'लाठी नव्हे, संवाद हवा!' सर्वोच्च न्यायालयाचा सरकारला स्पष्ट संदेश; आता राजकीय हट्ट मोठा की न्यायालयाचा सल्ला?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

नीट-यूजी प्रश्नपत्रिका गळती प्रकरणानंतर देशभर उभ्या राहिलेल्या विद्यार्थी आंदोलनांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला अत्यंत महत्त्वाचा संदेश दिला आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले की, आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी, युवकांशी आणि आंदोलनाच्या आयोजकांशी आक्रमक भूमिका घेण्यापेक्षा त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आणि समजावून सांगणे हा अधिक परिणामकारक मार्ग आहे. सर्वात मोठे साधन म्हणजे संवाद आणि तर्क. विद्यार्थ्यांना ऐका, त्यांना शांत करा. सरकारला परिस्थिती कशी हाताळायची हे माहिती आहे, असे न्यायालयाने सुनावणीदरम्यान मौखिक निरीक्षण नोंदवले.

हे निरीक्षण केवळ न्यायालयीन टिप्पणी म्हणून पाहता येणार नाही, तर लोकशाही व्यवस्थेतील राज्यसत्तेला दिलेला एक व्यापक संदेश म्हणूनही त्याकडे पाहिले जात आहे. विद्यार्थी आंदोलन, बेरोजगारी, परीक्षा व्यवस्थेवरील अविश्वास आणि पारदर्शकतेच्या मागण्या या प्रश्नांवर कठोर प्रशासकीय कारवाईपेक्षा विश्वासाचे वातावरण निर्माण करणे अधिक आवश्यक असल्याचे न्यायालयाने अप्रत्यक्षपणे अधोरेखित केले.

गेल्या काही आठवड्यांत नीट-यूजी प्रश्नपत्रिका गळतीच्या आरोपांमुळे देशभर अनेक ठिकाणी विद्यार्थी रस्त्यावर उतरले. विविध संघटनांनी निषेध मोर्चे, धरणे आणि आंदोलनांची हाक दिली. काही ठिकाणी आंदोलनकर्ते आणि पोलिसांमध्ये तणाव निर्माण झाल्याच्या घटनाही समोर आल्या. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेला संवादाचा सल्ला विशेष महत्त्वाचा मानला जात आहे.

आता सर्वात मोठा प्रश्न असा आहे की, सरकार सर्वोच्च न्यायालयाच्या या संदेशाचा गांभीर्याने विचार करणार का? विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या शंका दूर करण्याचा मार्ग स्वीकारला जाईल का, की आंदोलनांना केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न मानून कठोर प्रशासकीय पावलेच पुढेही सुरू राहतील? या प्रश्नांची उत्तरे येत्या काही दिवसांत सरकारच्या भूमिकेतून स्पष्ट होतील.

हेही लक्षात घेणे आवश्यक आहे की, न्यायालयाने सरकारला कोणताही बंधनकारक आदेश दिलेला नाही. ही सुनावणीदरम्यान व्यक्त केलेली मौखिक टिप्पणी आहे. मात्र, देशातील सर्वोच्च न्यायालयाने लोकशाहीत संवाद, संयम आणि तर्क यांना प्राधान्य देण्याचा दिलेला संदेश दुर्लक्षित करणे सोपे नाही.

आजचा खरा मुद्दा केवळ एका आंदोलनाचा नाही. तो लोकशाहीच्या कार्यपद्धतीचा आहे. असंतोष व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना विरोधक म्हणून पाहायचे की भविष्य घडवणारे नागरिक म्हणून, हा निर्णय कोणत्याही सरकारपुढील सर्वात मोठा कस असतो. न्यायालयाने संवादाचा मार्ग दाखवला आहे; आता सरकार त्या मार्गाने चालते की वेगळा मार्ग स्वीकारते, याकडे देशभरातील विद्यार्थी, पालक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय

### 'आपला-परका' यादीचा नवा उद्योग सुरू! महाराष्ट्रात सरकार चालतंय की 'व्हेरिफिकेशन एजन्सी'?

कधी काळी सरकार विकासाच्या कामांची यादी तयार करायचं. रस्ते किती झाले, रोजगार किती निर्माण झाला, उद्योग किती आले, शेतकऱ्यांचं उत्पन्न किती वाढलं ही आकडेवारी मांडली जायची. पण आता महाराष्ट्रात वेगळाच उद्योग सुरू झाल्याचा आरोप होत आहे. आता विकासाची यादी नाही, तर कोण आपला आणि कोण परका? याची यादी तयार होत आहे, असा गंभीर आरोप विरोधक करत आहेत. प्रश्न असा आहे की सरकार लोकांचा विश्वास जिंकण्यात अपयशी ठरत असेल, तर आता लोकांचीच छाननी करून सत्ता टिकवण्याचा प्रयत्न सुरू आहे का?

४ ऑगस्ट २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन काही कथित कागदपत्रे दाखवली आणि दावा केला की **SIR** अर्थात **Special Intensive Revision** च्या नावाखाली गावागावांत नागरिकांची माहिती गोळा केली जात आहे. त्यांच्या आरोपानुसार, केवळ मतदार यादी अद्ययावत होत नाही, तर कोण आपला आणि कोण परका याची राजकीय नोंदही ठेवली जात आहे. जर हा आरोप खोटा असेल, तर सरकारने एका दिवसात पुराव्यांसह तो खोटा ठरवावा. पण जर उत्तर देण्याऐवजी शांतता असेल, तर प्रश्न तर विचारले जातीलच.

आज महाराष्ट्रातील अधिकारी पाहिले, तर असं वाटतं की राज्यात पाणीटंचाई नाही, बेरोजगारी नाही, शेतकऱ्यांचे प्रश्न नाहीत, रस्त्यांवरील खड्डे नाहीत, स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक अडचण नाही. कारण सगळ्यात मोठं राष्ट्रीय कर्तव्य जणू एकच उरलं आहे **SIR**! महसूल विभाग, ग्रामपंचायत, स्थानिक प्रशासन, विविध कार्यालये जिथे पाहावं तिथे एकच धावपळ. इतकी तातडी विकासकामांसाठी कधी दिसली होती का? की मतदारांची यादीच आता सरकारच्या दृष्टीने सर्वात मोठा विकास प्रकल्प ठरली आहे?

लोकशाहीमध्ये प्रशासन हे संविधानाचं असतं, पक्षाचं नसतं. अधिकारी सरकारचे कर्मचारी असतात; पक्षाचे कार्यकर्ते नसतात. पण जर प्रत्येक अधिकाऱ्याला एका राजकीय प्राधान्यक्रमासाठी झोकून दिलं जात असेल, तर प्रश्न निर्माण होणारच. प्रशासन चालतंय की राजकीय व्यवस्थापन?

लोकप्रियता कमी होणं ही लोकशाहीची नैसर्गिक प्रक्रिया आहे. जनता प्रश्न विचारते, नाराजी व्यक्त करते, सरकार बदलते. पण जर उत्तर विकासाऐवजी डेटा संकलन, वर्गीकरण आणि नागरिकांच्या राजकीय ओळखीचा शोध घेणं असेल, तर ती लोकशाहीची ताकद नसून असुरक्षित सत्तेची लक्षणं मानली जातात.

आज प्रश्न फक्त मतदार यादीचा नाही. प्रश्न मानसिकतेचा आहे. सरकारला मतदार हवा आहे की समर्थक? नागरिक हवा आहे की भक्त? संविधानाने प्रत्येक भारतीयाला समान नागरिक मानलं आहे. पण जर राज्ययंत्रणाच नागरिकांना आपला आणि परका अशा चौकटीत पाहू लागली, तर संविधान पुस्तकात उरेल आणि व्यवहारात राजकीय निष्ठेचं प्रमाणपत्र महत्त्वाचं ठरेल. आज विरोधकांचा आरोप आहे, उद्या कदाचित एखाद्या सामान्य नागरिकाचं नाव यादीतून गायब होईल, एखाद्याला वारंवार कागदपत्रं मागितली जातील, एखाद्यावर संशयाची सावली टाकली जाईल. लोकशाहीचा सर्वात मोठा धोका टँक किंवा बंदूक नसते; नागरिकाच्या मनात निर्माण होणारी भीती असते. सरकारकडे आज संधी आहे. संपूर्ण ड्खठ प्रक्रिया सार्वजनिक करा. अधिकाऱ्यांना काय सूचना दिल्या, कोणती माहिती गोळा होते, तिचा वापर कशासाठी होतो, हे सर्व स्पष्ट करा. कारण पारदर्शकतेला घाबरणारं सरकारच संशयाला जन्म देतं. शेवटी एकच प्रश्नसरकार मतदार शोधत आहे की विरोधक शोधत आहे? कारण निवडणूक जिंकण्यासाठी जनतेचा विश्वास लागतो; नागरिकांची फाईल नाही. लोकशाहीमध्ये मतदारांना क्रमांक दिले जातात, पण शिक्के नाही. आपला आणि परका ही भाषा संविधानाची नाही; ती सत्तेवर जास्त प्रेम करणाऱ्यांची भाषा असते. आणि ज्या दिवशी सरकारला नागरिकांपेक्षा त्यांच्या राजकीय निष्ठेची जास्त काळजी वाटू लागते, त्या दिवशी लोकशाहीला निवडणुका असतातपण आत्मा उरत नाही.

# पिंपरी-चिंचवड : सुनेत्रा पवारांच्या 'त्या' वक्तव्याचा तीव्र निषेध; राष्ट्रवादीचे शहरात जोरदार आंदोलन, माफीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

महायुतीच्या नेत्या सुनेत्रा पवार यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर केलेल्या एका वादग्रस्त वक्तव्याचे तीव्र पडसाद पिंपरी-चिंचवड शहरात उमटले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार गट) स्थानिक कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी रस्त्यावर उतरत सुनेत्रा पवार यांच्याविरोधात जोरदार निदर्शने केली. ''निषेध मोर्चा'' काढत आंदोलकांनी सुनेत्रा पवार यांनी आपल्या वक्तव्याबद्दल संपूर्ण महाराष्ट्राची जाहीर माफी मागावी, अशी आक्रमक मागणी केली आहे.बॅनर्स आणि घोषणाबाजीने परिसर दणाणलापिंपरी-चिंचवडमधील मुख्य चौकात जमलेल्या पक्षाच्या सदस्यांनी हातात ''तीव्र निषेध'' आणि ''निषेध आंदोलन'' असे लिहिलेले मोठे बॅनर्स व पोस्टर्स धरले होते. आंदोलकांनी सुनेत्रा पवार यांच्या निषेधाच्या घोषणा देत संपूर्ण परिसर दणाणून सोडला. राजकीय स्वार्थासाठी ज्येष्ठ नेत्यांबद्दल अशी बेजबाबदार वक्तव्ये खपवून घेतली जाणार नाहीत, असा इशारा यावेळी राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी दिला.




तणावाचे वातावरण, पोलिसांचा मोठा बंदोबस्तया वादग्रस्त वक्तव्यामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा संताप पाहायला मिळाला. आंदोलनाचे गांभीर्य लक्षात घेता अनुचित प्रकार टाळण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी घटनास्थळी कडक बंदोबस्त तैनात केला होता. या आंदोलनामुळे शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, आगामी काळात हा वाद अधिक पेटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीचे महत्त्वपूर्ण निर्णय; पशुवैद्यकीय सेवा, क्रीडा सुविधा, पायाभूत कामांना मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची बैठक बुधवारी अध्यक्ष बाबासाहेब त्रिभुवन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत पशुवैद्यकीय सेवा, क्रीडा सुविधा, पायाभूत सुविधा, आरोग्य, स्वच्छता आणि आपत्कालीन व्यवस्थापनाशी संबंधित विविध विषयांना मंजुरी देण्यात आली.



बैठकीत महापालिकेच्या पशुरुग्णालयातील पशुशल्यचिकित्सक, पशुवैद्यकीय अधिकारी, पॅरावेट कर्मचारी आणि इतर आवश्यक मनुष्यबळ पुरविण्याच्या सेवेला नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे पशुवैद्यकीय सेवा, प्राणिसंग्रहालयातील सेवा तसेच भटक्या प्राण्यांशी संबंधित अत्यावश्यक सेवा अखंडित सुरू राहणार आहेत.

महापालिकेच्या विविध विभागांसाठी आवश्यक फर्निचर व साहित्य खरेदीला मंजुरी देण्यात आली. तसेच शहरातील रस्ते, बीआरटी मार्गावरील रेलिंग, फुटपाथ दुरुस्ती आणि इतर पायाभूत सुविधांच्या कामांनाही हिरवा कंदील देण्यात आला.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वार्षिक परीक्षेसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच जलशुद्धीकरण केंद्रातील आपत्ती व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणाऱ्या पंपांच्या संचालन व देखभालीसाठी आवश्यक कार्यवाही करण्यासही मान्यता देण्यात आली.

बैठकीत वायसीएम रुग्णालयाच्या नव्या इमारतीला नाव देण्याचा प्रस्ताव महापालिका सभेकडे शिफारस करण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय सार्वजनिक शौचालये व मुताऱ्यांची यांत्रिक पद्धतीने साफसफाई आणि देखभाल करण्याच्या कामालाही मंजुरी देण्यात आली.

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर अग्निशमन विभागाच्या मदतीसाठी कार्यरत असलेल्या 'आपदा मित्र' आणि ट्रेनी फायरमन यांच्या मानधनासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याचा निर्णयही स्थायी समितीने घेतला. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध राहावे, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

याशिवाय कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील स्वच्छता, देखभाल आणि उद्यान व्यवस्थापनाच्या कामांना मुदतवाढ देण्यासही मंजुरी देण्यात आली.

या निर्णयामुळे क्रीडा सुविधांची नियमित देखभाल होऊन खेळाडूंना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

स्थायी समितीच्या बैठकीतील या निर्णयांमुळे नागरिकांना दिल्या जाणाऱ्या अत्यावश्यक सेवांची गुणवत्ता वाढण्याबरोबरच शहरातील पायाभूत सुविधा, आरोग्य, स्वच्छता आणि आपत्कालीन व्यवस्थापन अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

## धरणे तुडुंब, तरी जलतरण तलाव कुलूपबंद! सांगवी, कासारवाडीतील क्रीडाप्रेमींची नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

पवना धरणासह परिसरातील सर्वच प्रमुख जलसाठ्यांमध्ये मुबलक पाणीसाठा जमा झाला आहे. शहराची तहान भागवणारी धरणे तुडुंब भरून वाहत असताना, दुसरीकडे पिंपरी-चिंचवड महापालिकेतील जलतरण तलाव मात्र असूनही सुरू झालेले नाहीत.

सांगवी येथील कै. बाळासाहेब शितोळे जलतरण तलाव आणि कासारवाडी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलाव अजूनही बंदच आहेत. पाणीटंचाईच्या नावाखाली लावण्यात आलेले हे टाळे पाऊस सुरू होऊन महिना उलटला तरी न उघडल्याने स्थानिक क्रीडाप्रेमी, नियमित पोहणारे नागरिक आणि लहान मुलांमध्ये नाराजी आहे. धरणे भरली तरी महापालिकेची पाणी कपातीची नियमावली का लागू आहे, असा थेट प्रश्न आता नागरिक विचारत आहेत.

जूनमध्ये पुरेसा पाऊस न झाल्यामुळे महापालिकेने पाणीकपात जाहीर केली होती. शहरातील पालिकेचे जलतरण तलाव बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले. परंतु, जुलै महिन्यात समाधानकारक पाऊस झाला, धरणे भरली. असे असतानाही जलतरण तलाव पूर्ववत सुरू करण्याबाबत क्रीडा विभागाकडून कोणतीही हालचाल झालेली नाही. तलावांच्या दारावर अजूनही 'पाणीकपातीमुळे जलतरण तलाव बंद' असे फलक झळकत आहेत. नियमित पोहणारे, आरोग्याची काळजी घेणारे ज्येष्ठ नागरिक, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांची तयारी करणारे जलतरणपटू आणि उन्हाळ्यानंतरही पोहण्याचा नियमित सराव करणारे जलतरणप्रेमी यांच्यावर हा अन्याय होत असल्याची भावना त्यांच्यामध्ये आहे.

## उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते 'हॅकेथॉन २०२५' विजेत्यांचा गौरव; तरुणांच्या नवोन्मेषी कल्पनांना मिळाले व्यासपीठ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतर्फे आयोजित 'पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हॅकेथॉन २०२५' स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ बुधवारी उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील उपमहापौर कार्यालयात उत्साहात पार पडला. शहराच्या विकासासाठी तंत्रज्ञानाधिष्ठित आणि नाविन्यपूर्ण उपाययोजनांना प्रोत्साहन देणाऱ्या या स्पर्धेतील विजेत्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.

स्पर्धेत समाधान नरळे यांनी प्रथम क्रमांक पटकावत २५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक मिळविले. करण कदम यांनी द्वितीय क्रमांक मिळवत १५ हजार रुपये, तर कु. मृण्मयी सावंत यांनी तृतीय क्रमांक मिळवत १० हजार रुपयांचे रोख पारितोषिक प्राप्त केले. द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या पालकांनी पारितोषिक स्वीकारले.

यावेळी बोलताना उपमहापौर शर्मिला बाबर म्हणाल्या, हॅकेथॉनसारख्या स्पर्धा तरुणांच्या कल्पकतेला आणि तांत्रिक कौशल्याला दिशा देणारे प्रभावी व्यासपीठ आहे.



शहरातील विविध नागरी समस्यांवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याची क्षमता आपल्या युवकांमध्ये आहे. अशा उपक्रमांमुळे नवोन्मेषी विचारांना चालना मिळते आणि भविष्यात स्मार्ट, सक्षम व नागरिकाभिमुख शहर उभारण्यास निश्चितच मदत होते. महापालिका भविष्यातही अशा स्पर्धांना सातत्याने प्रोत्साहन देईल. या कार्यक्रमास नगरसेविका योगिता नागरगोजे, उपआयुक्त पंकज पाटील, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, दीपक पवार, रमेश आवटे, हेमंत घाडगे, उज्ज्वला करपे, सुनीता चौगुले, संजय जाधव तसेच सामाजिक कार्यकर्ते मंगेश भालेराव आदी उपस्थित होते. कार्यक्रमात विजेत्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच महापालिकेच्या विविध सेवांमध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि नागरिककेंद्रित नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी भविष्यातही अशा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# भाडेकरूने घरातील सोन्याचे दागिने चोरून ठेवले बनावट दागिने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी : प्रतिनिधी**

पोलीस ठाणे: शिरगाव

घटना: गहुंजे (ता. मावळ) येथील लोढा बेलमेंडो टॉवरमध्ये राहणाऱ्या सबिना कोर मारवा (वय ५८) यांच्या घरातून आरोपी भाडेकरू अभिषेक लाखनसिंग सेंगर (वय २७, रा. इंदूर, मध्य प्रदेश) याने २९,२५,६०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरले. चोरी लपवण्यासाठी आरोपीने मूळ दागिन्यांच्या जागी लाकडी कपाटात बनावट (नकली) सोन्याचे दागिने ठेवून घरमालकाची फसवणूक केली.

कारवाई: शिरगाव पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक केंदे पुढील तपास करत आहेत.

**कासारवाडीत जुन्या भांडणाचा राग; तरुणावर ब्लॉक व दगडाने प्राणघातक हल्ला**

कासारवाडी (पुणे): कासारवाडी येथील गुलीस्ताननगर भागात जुन्या भांडणाचा राग मनात धरून एका तरुणावर सिमेंटचा ब्लॉक व दगडाने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे.

अरबाज ताज शेख (वय २४, रा. कासारवाडी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दापोडी पोलिसांनी अरबाज कुरेशी व त्याच्या दोन अनोळखी साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी अरबाज ल्युडो खेळत असताना आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत सिमेंटच्या ब्लॉकने आणि गाड्यांची तोडफोड करत हल्ला केला. दापोडी पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

**हिंजवडीत हॉटेलच्या काउंटरवरून ९३ हजारांचा ऐवज लंपास; चालकाविरुद्ध गुन्हा नोंद**

हिंजवडी (पुणे): हिंजवडी-माण रोडवरील खानदेश हॉटेलच्या काउंटरवरून ५ हजार रुपयांचा मोबाईल आणि ८८ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ९३,०००/- चा ऐवज पळवल्याप्रकरणी एका हॉटेल चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ॲड. मोनिका सचिन वाडकर (वय ४३, रा. बाणेर) यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी महावीर भागवत पवार (रा. उपळाई, ता. माढा, जि. सोलापूर) याला हॉटेलच्या पेमेंट स्वीकारण्यासाठी मोबाईल व रोकड सांभाळण्यास दिली होती. मात्र, त्याने विश्वासघात करत 'ऑनलाइन पे' द्वरे आलेल्या रक्कमेसह रोख रक्कम घेऊन पोबारा केला.

हिंजवडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पवार (९९७५४९०११५) पुढील तपास करत आहेत.

**कंपनीचा गोपनीय डेटा चोरून दुसऱ्या कंपनीला विकला; खराबवाडीतील ३ कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल**

चाकण / महाळुंगे: खराबवाडी (ता. खेड) येथील 'युनिफॉर्म इंजिनिअरिंग लि.' कंपनीचा अत्यंत गोपनीय डेटा, क्लायंट लिस्ट आणि तांत्रिक माहिती चोरून प्रतिस्पर्धी कंपनीला विकल्याप्रकरणी तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

व्यंकटा सुदर्शन चिलकलापल्ली (वय ३९) यांनी दिलेल्या तक्रारीवरून श्री. अभिषेक सत्यनारायण शर्मा (रा. तळेगाव दाभाडे), प्रशांत चव्हाण (रा. जि. पुणे) आणि ध्यानेश संजय देसले (रा. खराबवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आरोपींनी कंपनीचा डेटा चोरून कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान केले आणि प्रतिस्पर्धी कंपनीत रुजू होऊन ग्राहक पळवण्याचा प्रयत्न केला.

या प्रकरणाचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक नाळे (९०११९८९९९९) करत आहेत.

**बँक खाते भाड्याने देऊन सायबर फसवणूक: दिघी पोलिसांकडून दोघांना अटक**

दिघी (पुणे): बँक खाते सायबर भामट्यांना वापरण्यास देऊन नागरिकांची फसवणूक करण्यास मदत करणाऱ्या दोन तरुणांना दिघी पोलिसांनी अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी प्रतिक मोहन धुले (वय २२) आणि श्रीतेज नाना बुलाखे (वय २१) यांनी संगणमत करून 'धएड इरपड्ढ' चे खाते उघडले होते. या खात्यावर भारतातील एकूण ७ नागरिकांची २२,७४,६४०/- ची सायबर फसवणूक झालेली रक्कम जमा झाली होती. आरोपी श्रीतेज याने प्रतिकला ''तुझे बँक खाते वापरण्यास दे, तुला २५,००० रुपये कमिशन देतो'' असे आमिष दाखवून हे खाते सायबर फ्रॉडसाठी उपलब्ध करून दिले होते.

दिघी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक जगताप (९९२२०१४७५३) या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

**दोन कोटींचा दंड टाळण्यासाठी १० लाखांच्या लाचेची मागणी**

**पुणे : प्रतिनिधी**

कंपनीकडून नियमानुसार परवानगीपेक्षा अधिक खोदकाम झाल्यामुळे सुमारे दोन कोटी रुपयांचा दंड आकारला जाण्याची शक्यता होती. त्यामुळे या अतिरिक्त खोदकामाचा 'नील' पंचनामा करून तब्बल दोन कोटी रुपयांचा दंड टाळून देण्याच्या मोबदल्यात १० लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी शिवाजीनगर तलाठी कार्यालयातील महिला तलाठी आणि कोतवाल यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तलाठी आश्विनी दत्तात्रय कोकाटे (३७) आणि कोतवाल महेश मधुकर मुंढे (३०) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. या प्रकरणातील तक्रारदार हे खोदकाम कंत्राटदार असून, त्यांच्या कंपनीकडून सेनापती बापट रस्त्यावरील सर्व्हे क्रमांक ९६७ मधील व्यावसायिक प्रकल्पाच्या इमारतीच्या पायाचे खोदकाम सुरू होते. या कामाची पाहणी करताना तलाठी आश्विनी कोकाटे यांनी नियमानुसार परवानगीपेक्षा तब्बल ३ हजार २०० ब्रास अधिक खोदकाम झाल्याचा पंचनामा केला होता. या अतिरिक्त खोदकामामुळे तक्रारदारावर सुमारे दोन कोटी रुपयांचा दंड आकारला जाऊ शकत होता. हा दंड टाळण्यासाठी तहसीलदारांकडे 'नील' पंचनाम्याचा अहवाल सादर करून देण्याच्या बदल्यात आश्विनी कोकाटे यांनी तक्रारदाराकडे १० लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. तक्रारदाराने १५ जून २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर विभागाने पडताळणी केली असता, कोकाटे यांनी लाचेची रक्कम कोतवाल महेश मुंढे याच्याकडे देण्यास सांगितल्याचे स्पष्ट झाले. तसेच महेश मुंढे यानेही लाच स्वीकारण्याची तयारी दर्शवून या व्यवहाराला प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. पडताळणीत लाच मागणीची खात्री झाल्यानंतर मंगळवारी (दि. ४) सायंकाळी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८मधील कलम ७ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरू आहे. ही कारवाई शिरीष सरदेशपांडे, अपर पोलिस अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपअधीक्षक सतीश वाळके, पोलिस निरीक्षक आसावरी शेडगे, पोलिस शिपाई विकास आडके, वैशाली माकर आणि दीपक काकडे यांच्या पथकाने केली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### NOC साठी १० हजारांची लाच घेताना मुद्रांक कार्यालयातील लिपिक एसीबीच्या जाळ्यात; मध्यस्थासह दोघांवर गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

मोहम्मदवाडी येथील मालमत्तेसाठी आवश्यक असलेले ना हरकत प्रमाणपत्र (NOC) देण्यासाठी १० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी पुणे मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयातील एका लिपिकासह खाजगी मध्यस्थाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले आहे. याप्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, आसिफ इब्राहिम शेख (वय ३७), लिपिक, सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे आणि समीर सदरुद्दीन शाह (वय ३०), खाजगी मध्यस्थ, अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

तक्रारदाराने मोहम्मदवाडी परिसरातील ३,२०० चौरस फूट जागेची खरेदी केली होती. या मालमत्तेसंदर्भातील दस्तऐवजासाठी मुद्रांक शुल्क व नोंदणी विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र (छजउ) आवश्यक होते. हे प्रमाणपत्र देण्यासाठी आणि संबंधित फाईल पुढील मंजुरीसाठी पाठविण्याच्या मोबदल्यात आरोपी लिपिकाने मध्यस्थामार्फत १० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे.

तक्रारदाराने याबाबत एसीबीकडे तक्रार दाखल केली. त्यानुसार १६ जून २०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीत लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर एसीबीने सापळा रचून दोन्ही आरोपींना लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडले.

या प्रकरणी ४ ऑगस्ट २०२६ रोजी बंडगार्डन पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ मधील कलम ७ आणि १२ अन्वये विशेष खटला क्रमांक २०५/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन जाधव हे वरिष्ठ पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे आणि अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जनार्दन यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत..

# कडेठाण खुर्द येथे बालकाच्या जन्मनोंदीत कथित हेराफेरी; ग्रामसेविका व अंगणवाडी सेविकेवर कारवाईची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पैठण । प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील कडेठाण खुर्द (गेवराई मर्दा ग्रुप ग्रामपंचायत) येथे नवजात बालकाच्या जन्माची दफ्तरी नोंद न घेता चुकीची माहिती देऊन पालकांची दिशाभूल केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित ग्रामसेविका व अंगणवाडी सेविकेविरुद्ध शिस्तभंगाची तसेच फौजदारी कारवाई करण्याची मागणी तक्रारदार शिवनाथ भास्कर दौंड यांनी गट विकास अधिकारी आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी, पैठण यांच्याकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे.

तक्रारीनुसार, शिवनाथ दौंड यांच्या मुलाचा जन्म २४ मार्च २०२६ रोजी झाला. जन्म-मृत्यू नोंदणीसाठी आवश्यक असलेले डिस्चार्ज कार्ड व इतर कागदपत्रांसह त्यांनी ६ एप्रिल २०२६ रोजी ग्रामसेविका सौ. मनीषा ठोंबरे यांच्याकडे अर्ज सादर करून त्याची पोहोचही घेतली होती.

मात्र, १२ जून २०२६ रोजी जन्मदाखला घेण्यासाठी ग्रामपंचायतीत गेल्यानंतर संबंधित जन्माची दफ्तरी नोंद नसल्याचे सांगण्यात आले. तसेच, बालकाचा जन्म आडुळ प्राथमिक आरोग्य केंद्रात झाल्याची माहिती अंगणवाडी सेविकेकडून मिळाल्याचे सांगत तक्रारदारांना तेथे पाठविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यानंतर तक्रारदारांनी १३ जून २०२६ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, आडुळ येथे चौकशी केली असता, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी लेखी पत्राद्वारे संबंधित महिलेची प्रसूती त्या आरोग्य केंद्रात झालेली नसल्याचे स्पष्ट केल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. यावरून ग्रामसेविका आणि अंगणवाडी सेविकेने चुकीची माहिती देऊन शासकीय नोंदीत हेराफेरी केल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

या कथित प्रकारामुळे बालकाच्या पालकांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदारांनी जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ तसेच भारतीय न्याय संहिता (इछड) अंतर्गत संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची, ग्रामसेविकेवर शिस्तभंग व निलंबनाची कारवाई करण्याची आणि संबंधित बालकाची जन्मनोंद तातडीने करून जन्मदाखला देण्याची मागणी केली आहे.

याबाबतचे निवेदन गट विकास अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडेही पाठविण्यात आले आहे. प्रशासनाने तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही तक्रारदारांनी दिला आहे.

दरम्यान, या प्रकरणी ग्रामसेविका, अंगणवाडी सेविका किंवा संबंधित प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यांचा प्रतिसाद मिळाल्यानंतर तोही प्रसिद्ध करण्यात येईल.

## कृषी विभागाच्या भरारी पथकाची उरुळी कांचन व शिंदवणे परिसरात धाड; कृषी सेवा केंद्रांवर गुन्हे दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

उरुळी कांचन । प्रतिनिधी

शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी तसेच अनधिकृत बियाणे, खते आणि कृषी निविष्ठांच्या विक्रीला आळा घालण्याच्या उद्देशाने कृषी विभागाच्या विशेष भरारी पथकाने उरुळी कांचन व शिंदवणे परिसरातील कृषी सेवा केंद्रांवर धडक कारवाई केली. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन आणि संशयास्पद कृषी निविष्ठांचा साठा आढळून आल्याने संबंधित दुकानदारांविरुद्ध उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कृषी विभागाच्या विशेष भरारी पथकाने ही कारवाई गोपनीय पद्धतीने राबविली. तपासणीदरम्यान मुदत संपलेल्या परवान्यांचा वापर, आवश्यक परवानगीशिवाय कृषी निविष्ठांची विक्री, तसेच संशयास्पद बियाणे व खतांचा साठा आढळून आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या प्रकरणात संबंधित कृषी सेवा केंद्र चालकांविरुद्ध उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून, जप्त करण्यात आलेल्या साहित्याची तपासणी आणि नमुने प्रयोगशाळेत पाठविण्याची प्रक्रिया सुरू आहे. तपास अहवालानंतर संबंधितांवर कायद्यानुसार पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

कृषी विभागाने शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, बियाणे, खते किंवा इतर कृषी निविष्ठा खरेदी करताना अधिकृत परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावी. खरेदीची पावती जतन करावी आणि कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तातडीने कृषी विभाग किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

या कारवाईमुळे परिसरातील अनधिकृत कृषी निविष्ठा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून, कृषी विभागाकडून अशा धाडी पुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## पोलिस असल्याची बतावणी करून लाखभराचे सोन्याचे दागिने लंपास; मंचर पोलिसांत गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी




आंबेगाव तालुक्यातील एकलहरे येथे पोलिस असल्याची बतावणी करून दोन भामट्यांनी एका व्यक्तीची फसवणूक करत तब्बल १ लाख १९ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने हातचलाखीने लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात दोन अज्ञात इसमांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रकाश गुरुसंगप्पा पाटील (वय ५२, रा. एकलहरे, ता. आंबेगाव) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. ही घटना २६ जुलै २०२६ रोजी सकाळी सुमारे ११.३५ वाजण्याच्या सुमारास पुणे-नाशिक महामार्गालगत रवी किरण हॉटेल परिसरात घडली.

प्रकाश पाटील हे त्यांच्या होंडा दुचाकीवरून मंचरहून एकलहरेकडे जात असताना काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांना अडवले. त्यांनी स्वतःला पोलिस असल्याचे सांगत परिसरात एका महिलेच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी झाल्याचे कारण पुढे केले. त्यानंतर तपासाच्या नावाखाली पाटील यांना अंगावरील दागिने काढण्यास भाग पाडले.

आरोपींनी फिर्यादींच्या गळ्यातील १६.१०० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन आणि ६.३०० ग्रॅम वजनाची गणपतीच्या पेंडलसह सोन्याची अंगठी रुमालात ठेवण्यास सांगितले. त्यानंतर हातचलाखीने रुमालातील खरे दागिने काढून घेत बनावट पुडी फिर्यादींच्या हाती दिली आणि दोघेही मोटारसायकलवरून पसार झाले. या फसवणुकीत फिर्यादींचे एकूण १ लाख १९ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास झाले. याप्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात दोन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध घेतला जात आहे.

**नागरिकांनी सतर्क राहावे**

पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अनोळखी व्यक्ती पोलिस असल्याची बतावणी करून तपासाच्या नावाखाली अंगावरील दागिने काढण्यास सांगत असल्यास त्यांच्यावर विश्वास ठेवू नये. अशा प्रकारचा संशयास्पद प्रसंग घडल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधून माहिती द्यावी.

## डिजिटल जलनियोजनात महाराष्ट्राची मोठी झेप; ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे नागरिकांसाठी मोफत उपलब्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना **(WDC-PMKSY 2.0)** अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी अत्याधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली **(GIS)** विकसित करून राज्यातील ५७ हजार ८५८ सूक्ष्म पाणलोट (मायक्रो वॉटरशेड) नकाशे प्रथमच सर्वसामान्य नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. या उपक्रमामुळे जलसंधारण, भूजल पुनर्भरण, पाण्याचे शास्त्रशुद्ध नियोजन आणि ग्रामविकासाच्या कामांना नवी दिशा मिळणार आहे.




या डिजिटल प्रणालीमुळे आता शेतकरी, ग्रामपंचायती, विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकांना संगणक किंवा मोबाईलवरून आपल्या गावाच्या पाणलोट क्षेत्राची माहिती सहज उपलब्ध होणार आहे.

नदी-नाले, ओढे, जमिनीचा उतार, मातीचा प्रकार, भूजल पुनर्भरण क्षमता, गट क्रमांक तसेच शेततळे, सिमेंट नाला बांध **(CNB)**, गॅबियन, सलग समतल चर **(CCT)** यांसारख्या जलसंधारण कामांसाठी योग्य स्थळांची माहिती एका क्लिकवर मिळणार आहे.

पूर्वी अशा प्रकारच्या नियोजनासाठी क्षेत्र पाहणी, कागदी नकाशे आणि विविध विभागांकडील माहितीवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र, आता उपग्रह प्रतिमा, डिजिटल एलिव्हेशन मॉडेल **(DEM)**, **GPS** सर्वेक्षण, मृदा, पर्जन्यमान आणि भूजल यांसारख्या माहितीचे वैज्ञानिक विश्लेषण करून अचूक नियोजन करणे शक्य झाले आहे.

वाढते हवामान बदल, अल्पावधीत होणारी अतिवृष्टी, मृदा धूप आणि घटणारी भूजल पातळी या आव्हानांचा सामना करण्यासाठी जलसंधारणाची कामे योग्य ठिकाणी आणि शास्त्रीय पद्धतीने होणे आवश्यक आहे. यासाठी ही **GIS** प्रणाली प्रभावी साधन ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

या उपक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे राज्यातील ५७ हजार ८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे प्रथमच सर्वांसाठी खुले करण्यात आले आहेत. त्यामुळे शासनाकडे असलेली तांत्रिक माहिती आता नागरिकांपर्यंत पोहोचली असून जलसंधारणाच्या नियोजनात लोकसहभागालाही चालना मिळणार आहे.

नागरिकांना आपल्या गावाचा सूक्ष्म पाणलोट नकाशा पाहण्यासाठी आणि डाउनलोड करण्यासाठी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देता येणार आहे. या उपक्रमामुळे जलसंधारणाचे नियोजन अधिक पारदर्शक, शास्त्रीय आणि परिणामकारक होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## शेअर मार्केटमध्ये भरघोस परताव्याचे आमिष; २२ लाखांची फसवणूक, बारामती न्यायालयाचे गुन्हा दाखल करण्याचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

बारामती : प्रतिनिधी

शेअर मार्केटमध्ये भरघोस परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून २२ लाख रुपयांची कथित फसवणूक केल्याप्रकरणी बारामती न्यायालयाने संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. सायबर गुन्हेगार आणि अनधिकृत ट्रेडिंग संस्थांकडून गुंतवणूकदारांची फसवणूक होत असल्याच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाच्या या आदेशाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराला ऑनलाइन माध्यमातून तसेच सोशल मीडिया ग्रुपच्या माध्यमातून संपर्क साधण्यात आला. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास दरमहा आकर्षक परतावा मिळेल, असे आमिष दाखवत आरोपींनी सुरुवातीला विश्वास संपादन करण्यासाठी खोटा नफा दाखवला. त्यानंतर वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने एकूण २२ लाख रुपये जमा करून घेत फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणात सुरुवातीला पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात विलंब झाल्याने पीडित व्यक्तीने बारामती न्यायालयात धाव घेतली. तक्रारीची दखल घेत न्यायालयाने संबंधित पोलीस ठाण्याला गुन्हा नोंदवून कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायालयाच्या आदेशानंतर संबंधित पोलीस ठाण्यात प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) नोंदवून तांत्रिक तपास सुरू होण्याची शक्यता आहे. आरोपींनी वापरलेली बँक खाती, मोबाईल क्रमांक, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि ऑनलाइन व्यवहारांची माहिती तपासली जाणार आहे.

गेल्या काही महिन्यांत बारामतीसह पुणे ग्रामीण भागात बनावट ट्रेडिंग ॲप्स आणि अनधिकृत गुंतवणूक संस्थांच्या माध्यमातून गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत.

त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अनोळखी व्यक्ती किंवा संस्थेच्या भरघोस परताव्याच्या आश्वासनांवर विश्वास ठेवू नये, तसेच गुंतवणूक करण्यापूर्वी संबंधित संस्था अधिकृत आहे की नाही याची खात्री करूनच आर्थिक व्यवहार करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कलासारथी कला मंचाचा पहिला वर्धापनदिन उत्साहात; वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना चादरी व गोड भोजनाचे वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

जुन्नर : विशेष प्रतिनिधी

जुन्नर तालुक्यातील बल्लाळवाडी येथील राजाराम पाटील वृद्धाश्रमात कलासारथी कला मंच, पुणे (रजि.) या संस्थेचा पहिला वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापनदिनानिमित्त स्वर्गीय एकनाथशेठ होनराव यांच्या स्मरणार्थ वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना चादरी व जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच निराधार ज्येष्ठांसाठी गोड भोजनाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून लाला अर्बन सहकारी बँकेचे अधिकारी सतीश जाधव, सावली फाउंडेशनचे अध्यक्ष कमलेश थोरात, अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक कमलेश थोरात, आदित्य राजे मराठे, चित्रपट अभिनेत्री तथा घोडेगावची कन्या ऐश्वर्या मारुती दौंड, ह.भ.प. विकास महाराज हगवणे, निळकंठशेठ होनराव, सचिनशेठ होनराव आणि दीपक घोडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात जयेश शिंदे यांच्या हस्ते गणेशपूजनाने झाली.

त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष नेहरकर यांनी केले. शंकर ठोंबरे यांनी प्रास्ताविक केले, तर संस्थेच्या कार्याचा आढावा रामदास काळे यांनी मांडला. पाहुण्यांचे स्वागत हेमंत काळे यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप कांताताई मस्करे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयेश शिंदे, उपाध्यक्षा कांताताई मस्करे, संस्थापक रामदास काळे, कोषाध्यक्ष शंकर ठोंबरे, सहकोषाध्यक्ष हेमंत काळे, प्रमुख सल्लागार प्रकाश नेहरकर, कार्यकारिणी सदस्य संतोष नेहरकर तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नरसिंगपूर : बाळू गलांडे बेपत्ता प्रकरण; घातपाताचा संशय, प्रत्यक्षदर्शींचा खळबळजनक खुलासा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नरसिंगपूर : विशेष प्रतिनिधी

तीर्थक्षेत्र नरसिंगपूर येथून एक धक्कादायक वृत्त समोर येत असून, अक्षय उर्फ बाळू गलांडे याच्या बेपत्ता होण्यामागे मोठा घातपात झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या संदर्भात एका प्रत्यक्षदर्शीने दिलेली माहिती सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून परिसरात खळबळ उडाली आहे.

**काय आहे नेमके प्रकरण?**

व्हायरल होत असलेल्या व्हिडिओ क्लिपमधील माहितीनुसार, काही व्यक्तींनी संगनमत करून एका महिलेला आणि संबंधित तरुणाला या ठिकाणी आणले होते. तिथे त्यांच्यात वाद आणि 'दगाबाजी' झाल्याचे समोर येत आहे. प्रत्यक्षदर्शी 'नाथा सावंत' यांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयितांनी तरुणाला तात्पुरते सोडल्याचा बनाव केला. मात्र, त्याला आडबाजूला नेऊन जबर मारहाण केली आणि त्यानंतर त्याला पुलावरून खाली फेकल्याचा गंभीर संशय आता व्यक्त केला जात आहे.

तपासाची मागणीया धक्कादायक प्रकरणाची पोलिसात मिसिंग (बेपत्ता) म्हणून नोंद करण्यात आली असून, हा संपूर्ण प्रकार पूर्वनियोजित कट असल्याचा संशय प्रत्यक्षदर्शींच्या वक्तव्यावरून येत आहे. या प्रकरणी स्थानिक पोलीस प्रशासन सखोल तपास करत असून मुख्य संशयितांची चौकशी सुरू आहे.

## संत तुकाराम महाराजांच्या परतीच्या पालखीचा आज कुंजीरवाडीत मुक्काम; सभापती युवराज काकडे यांच्याकडून पालखीतळाची पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

कुंजीरवाडी (ता. हवेली) : प्रतिनिधी

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या परतीच्या पालखी सोहळ्याचा मुक्काम बुधवारी सायंकाळी कुंजीरवाडी येथे होणार असून, या पार्श्वभूमीवर पालखीतळ आणि विठ्ठल मंदिर परिसरातील सोयी-सुविधांची पाहणी करण्यात आली. हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज हिरामण काकडे यांनी पूर्वतयारीचा आढावा घेत आवश्यक सूचना दिल्या.

यंदाच्या परतीच्या पालखी सोहळ्यासाठी सुमारे दोन ते तीन हजार वारकरी कुंजीरवाडीत मुक्कामी राहणार असून, दर्शनासाठी पंचक्रोशीतून सहा ते सात हजार भाविक उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामपंचायत, स्थानिक प्रशासन आणि ग्रामस्थांकडून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. वारकरी आणि भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था लोकवर्गणीतून करण्यात आली आहे. तसेच परिसरातील ग्रामस्थांनी घरगुती भाकरीची व्यवस्था करून सेवाभाव जपल्याची माहिती यावेळी देण्यात आली. पाहणीदरम्यान ग्रामस्थांनी पालखी मुक्कामासाठी मंडप, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि इतर सुविधांसाठी आजपर्यंत शासनाकडून कोणताही निधी किंवा अनुदान मिळाले नसल्याची खंत व्यक्त केली. त्यामुळे सर्व व्यवस्था ग्रामस्थांनी स्वखर्चातून आणि लोकसहभागातून उभारल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सभापती युवराज काकडे यांनी सांगितले की, पंढरपूरकडे जाणाऱ्या पालखी सोहळ्याच्या मुक्कामस्थळांना शासनाकडून निधी व विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. त्याच धर्तीवर कुंजीरवाडीसह परतीच्या पालखीच्या सर्व मुक्कामस्थळांच्या विकासासाठी जिल्हा परिषद व राज्य शासनाकडे पाठपुरावा करून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

# 'पैसे नाहीत' हे कारण चालणार नाही! न्यायाधीशांच्या निवृत्ती वयावर सर्वोच्च न्यायालयाचा राज्यांना खडसावणारा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जिल्हा न्यायपालिकेतील न्यायिक अधिकाऱ्यांचे निवृत्ती वय ६० वरून ६२ वर्षे करण्याच्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांना स्पष्ट आणि कठोर संदेश दिला आहे. अतिरिक्त आर्थिक भार पडेल किंवा शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वय वेगळे आहे ही कारणे देऊन निवृत्ती वय वाढविण्यास विरोध करता येणार नाही, असे न्यायालयाने ठामपणे स्पष्ट केले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने अनेक राज्यांनी मांडलेले दोन्ही आक्षेप फेटाळून लावत, दोन आठवड्यांच्या आत या विषयावर स्वतंत्रपणे फेरविचार करून नवा निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाने हेही स्पष्ट केले की, संबंधित उच्च न्यायालयाने वेगळे मत व्यक्त केले असले तरी राज्य सरकारे सकारात्मक निर्णय घेण्यास बांधील नाहीत. उच्च न्यायालयांचे मत योग्य वेळी स्वतंत्रपणे विचारात घेतले जाईल.



राज्य सरकारांनी अतिरिक्त आर्थिक भाराचे कारण पुढे केले असले, तरी न्यायालयाने हा युक्तिवाद अमान्य केला. अनुभवी न्यायिक अधिकारी सेवेत कायम राहिल्यास नव्या भरती, प्रशिक्षण आणि नियुक्तीवरील खर्च टाळता येईल. त्यामुळे प्रत्यक्षात आर्थिक भार वाढण्याऐवजी तो कमी होण्याची शक्यता असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

याशिवाय, न्यायालयाने न्यायिक अधिकारी आणि शासकीय कर्मचारी यांच्यातील मूलभूत फरकही अधोरेखित केला. न्यायिक अधिकारी हे शासकीय कर्मचारी नाहीत. ते स्वतंत्र आणि वेगळ्या वर्गातील घटनात्मक पदाधिकारी आहेत, असे स्पष्ट निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

ही सुनावणी ऑल इंडिया जजेस असोसिएशन विरुद्ध भारत सरकार या ऐतिहासिक प्रकरणात झाली. या निर्णयामुळे देशभरातील जिल्हा न्यायपालिकेतील हजारो न्यायिक अधिकाऱ्यांच्या सेवाशर्तींवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर न्यायव्यवस्थेतील रिक्त पदे, प्रलंबित खटले आणि अनुभवी न्यायाधीशांची उपलब्धता या प्रश्नांवरही या निर्णयाचे दूरगामी परिणाम होऊ शकतात.

आता राज्य सरकारे सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट भूमिकेनंतर काय निर्णय घेतात, याकडे न्यायव्यवस्था, विधिज्ञ आणि सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## सारांश वृत्त

### सीजेपीच्या सौरव दासला मोठा धक्का! हायकोर्टाने बजावली नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली: प्रतिनिधी**

कॉकरोच जनता पार्टीचा (सीजेपी) सौरव दास याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या महिला न्यायाधीश न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांच्याविरोधात सोशल मीडियावर बदनामीकारक मोहीम चालवल्याप्रकरणी त्याच्यावर फौजदारी अवमानना याचिका दाखल करण्यात आली असून, या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने सौरव दासला नोटीस बजावली आहे. याशिवाय, या प्रकरणाशी संबंधित इलेक्ट्रॉनिक पुरावे नष्ट करण्याचा आरोपही त्याच्यावर ठेवण्यात आला आहे.

काय आहे नेमके प्रकरण?

दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांनी दिल्ली मद्यधोरण प्रकरणात माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, संजय सिंह आणि इतरांविरोधात न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी स्वतःहून दखल घेत कारवाई सुरू केली होती. याचिकाकर्त्यांच्या मते, या नेत्यांनी आणि सीजेपीच्या सौरव दासने कायदेशीर मार्ग अवलंबण्याऐवजी न्यायाधीशांची प्रतिमा मलिन करण्यासाठी सोशल मीडियावर नियोजित मोहीम राबवली. या प्रकरणात वकील अशोक चैतन्य यांनी दाखल केलेल्या याचिकेत असा दावा केला की, सौरव दास आणि आम आदमी पार्टीच्या नेत्यांनी न्यायाधीशांविरोधात केलेल्या सोशल मीडिया पोस्ट हटवून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र, याचिकाकर्त्याने या पोस्टचे डिजिटल रेकॉर्ड आधीच जतन केले असल्याचे सांगत ते न्यायालयात सादर करण्याची परवानगी मागितली. न्यायमूर्ती नवीन चावला आणि न्यायमूर्ती रविंदर दुडेजा यांच्या खंडपीठाने ही परवानगी मंजूर केली आहे.

दरम्यान, सीजेपीच्या सौरव दासने सोशल मीडियावरून कोणतीही पोस्ट किंवा कमेंट डिलीट केल्याचा आरोप फेटाळून लावला आहे.

## एअर इंडियाच्या पुनरुज्जीवनाची धुरा आफ्रिकेच्या दिग्गजाकडे! टाटा समूहाचा मोठा नेतृत्वबदल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टाटा समूहाच्या मालकीतील एअर इंडियाने आपल्या पुनर्रचना आणि विस्ताराच्या महत्त्वाकांक्षी प्रवासात मोठा निर्णय घेत, इथिओपियन एअरलाइन्सचे माजी प्रमुख टेवोल्डे गेब्रेमारियम यांची मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती केली आहे. ते कॅम्पबेल विल्सन यांची जागा घेणार असून, ३० सप्टेंबरनंतर अधिकृतपणे पदभार स्वीकारतील.

टेवोल्डे गेब्रेमारियम हे जागतिक विमान वाहतूक क्षेत्रातील अनुभवी आणि यशस्वी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नेतृत्वाखाली इथिओपियन एअरलाइन्सने आफ्रिकेतील सर्वात मोठ्या आणि सर्वाधिक यशस्वी विमान कंपनींपैकी एक म्हणून झेप घेतली. महसूल, ताफ्याचा विस्तार आणि आंतरराष्ट्रीय जाळे वाढवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. कोविड-१९ महामारी आणि बोईंग ७३७ मॅक्स दुर्घटनेनंतरच्या आव्हानांनाही त्यांनी यशस्वीपणे तोंड दिले होते. एअर इंडियासाठी ही नियुक्ती अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर झाली आहे. टाटा समूहाकडे कंपनी गेल्यानंतर आधुनिकीकरण, नवीन विमानांची खरेदी आणि सेवा सुधारण्याचे प्रयत्न सुरू असले तरी कंपनीला आर्थिक दबाव, नियामक तपासणी आणि कार्यप्रणालीशी संबंधित अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत अनुभवी नेतृत्वावर टाटा समूहाने विश्वास दाखवला आहे. टेवोल्डे गेब्रेमारियम यांच्या नियुक्तीमुळे एअर इंडियाच्या पुनरुज्जीवनाला नवी दिशा मिळेल का, सेवा गुणवत्ता आणि आर्थिक कामगिरीत अपेक्षित सुधारणा होईल का, याकडे आता संपूर्ण विमान वाहतूक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी वैशाली नागवडे; युवक प्रदेशाध्यक्षपदी निखिल ठाकरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी वैशाली नागवडे यांची नियुक्ती करण्यात आली असून, युवक प्रदेशाध्यक्षपदी निखिल ठाकरे यांची निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या हस्ते मुंबईतील 'देवगिरी' बंगल्यावर दोघांनाही नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



नाशिक येथील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात नाव आल्यानंतर तत्कालीन महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी २७ मार्च रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या जागी आता वैशाली नागवडे यांच्यावर पक्षाने महिला संघटनेची धुरा सोपविली आहे. नागवडे या दौंड तालुक्यातील असल्याने महिला प्रदेशाध्यक्षपद पुणे जिल्ह्याकडेच कायम राहिले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मान्यतेने या नियुक्त्या करण्यात आल्या. नियुक्तीपत्र स्वीकारल्यानंतर वैशाली नागवडे आणि निखिल ठाकरे यांनी पक्षाच्या प्रदेश कार्यालयात दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेसमोर नियुक्तीपत्र ठेवून अभिवादन केले.

यावेळी पक्षाचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, सहकोषाध्यक्ष संजय बोरगे, प्रदेश प्रवक्ते सुरज चव्हाण तसेच कार्यालयीन सचिव संजय तटकरे उपस्थित होते.

वैशाली नागवडे यांनी यापूर्वी 'महानंदा'च्या अध्यक्षपदाची जबाबदारीही यशस्वीपणे सांभाळली असून, त्यांच्या नियुक्तीमुळे पक्षाच्या महिला संघटनेला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केला आहे.

# लाल समुद्रात भारतीय जहाजावर भीषण हल्ला! येमेन किनाऱ्याजवळ तणाव; १३ भारतीयांची सुखरूप सुटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र


**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लाल समुद्रातील वाढत्या अस्थिरतेदरम्यान भारतीय ध्वजाखालील एका व्यापारी जहाजावर येमेनच्या किनाऱ्याजवळ मंगळवारी हल्ला झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या जहाजावर १३ भारतीय नागरिक कार्यरत होते. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सर्व भारतीयांची सुरक्षित सुटका करण्यात आली असून ते सुखरूप आहेत. या घटनेनंतर भारताने तातडीने राजनैतिक आणि सुरक्षा यंत्रणा सक्रिय केल्या आहेत.

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने सांगितले की, सौदी अरेबियातील रियाध येथील भारतीय दूतावास या संपूर्ण प्रकरणावर बारकाईने लक्ष ठेवून असून येमेनमधील संबंधित अधिकाऱ्यांशी सातत्याने समन्वय साधला जात आहे. जहाजावरील भारतीयांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून त्यांना आवश्यक ती सर्व मदत पुरविण्यात येत आहे.

लाल समुद्र हा जगातील सर्वाधिक महत्त्वाच्या सागरी व्यापारी मार्गांपैकी एक मानला जातो. गेल्या काही महिन्यांपासून या परिसरात व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार, ऊर्जा पुरवठा आणि जागतिक सागरी सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत भारतीय जहाजावर झालेला हा हल्ला केवळ सुरक्षा व्यवस्थेचाच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय सागरी वाहतुकीसमोरील वाढत्या धोक्याचाही इशारा मानला जात आहे.

सुदैवाने या हल्ल्यात कोणत्याही भारतीय नागरिकाला इजा झालेली नसली, तरी या घटनेमुळे संघर्षग्रस्त सागरी मार्गांवर कार्यरत भारतीय जहाजे आणि खलाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या हल्ल्यामागील नेमके कारण आणि जबाबदार घटकांचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू असून, परिस्थितीवर भारत सरकारचे बारकाईने लक्ष आहे.



## इथेनॉल धोरणावर प्रश्नचिन्ह! वाहन उद्योगाची माघार की सत्यावर पडदा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील इथेनॉल-मिश्रित इंधनाच्या वापरावरून निर्माण झालेला वाद आता अधिकच तीव्र झाला आहे. भारतीय वाहन उत्पादकांची सर्वोच्च संघटना भारतीय वाहन उत्पादक संघ यांनी केंद्र सरकारला पाठवलेल्या पत्रात इथेनॉल-मिश्रित इंधनामुळे वाहनांच्या सुट्या भागांचे नुकसान होत असल्याची चिंता व्यक्त केली होती. हे पत्र सार्वजनिक झाल्यानंतर देशभरात मोठी खळबळ उडाली. मात्र काही तासांतच संघटनेने आपल्या आधीच्या पत्रातील आकडेवारी मागे घेत, त्या आकडेवारीची सखोल पडताळणी करणे आवश्यक असल्याचे सांगत भूमिका बदलली. त्यामुळे आता प्रश्न असा निर्माण झाला आहे की, ही वस्तुस्थिती बदलली की केवळ भूमिका बदलली?

संघटनेने नव्या निवेदनात इंधनामुळे वाहनांचे नुकसान होत असल्याचा मुद्दा स्पष्टपणे नाकारलेला नाही. उलट, माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीची देशभरातून अधिक माहिती गोळा करून शास्त्रीय पद्धतीने पडताळणी करण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे. म्हणजेच, समस्या अस्तित्वात नाही असे त्यांनी सांगितलेले नाही; परंतु तिच्या प्रमाणाबाबत अधिक खात्री करण्याची गरज असल्याचे नमूद केले आहे.

ही संपूर्ण बाब समोर आल्यानंतर वाहनधारकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली. कारण देशभरातील सुमारे नव्वद हजार इंधन भरणी केंद्रांवर इथेनॉल-मिश्रित इंधनाचा पुरवठा बंधनकारक करण्यात आला आहे. अनेक वाहनधारकांनी इंजिन, इंधन पंप, रबर नळ्या, सील आणि इतर सुट्या भागांमध्ये बिघाड झाल्याच्या तक्रारी यापूर्वीच केल्या होत्या. या धोरणाविरोधात अनेक ठिकाणी आंदोलने झाली, न्यायालयात याचिका दाखल झाल्या आणि ग्राहक संघटनांनीही गंभीर आक्षेप नोंदवले.

या पार्श्वभूमीवर वाहन उत्पादक संघाने सरकारला इशारा देणारे पत्र पाठवले होते. परंतु तेच पत्र माध्यमांमध्ये प्रसिद्ध होताच संघटनेने आकडेवारी मागे घेतल्यामुळे संशय आणखी गडद झाला आहे. जर सुरुवातीची माहिती चुकीची होती, तर सरकारला इशारा का देण्यात आला? आणि जर चिंता खरी होती, तर ती सार्वजनिक झाल्यानंतर अचानक भूमिका का बदलली? हा केवळ आकडेवारीचा प्रश्न आहे की त्यामागे काही वेगळा दबाव आहे, अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

केंद्र सरकार इथेनॉल धोरणाला पर्यावरण संरक्षण, परदेशातून होणारी इंधन आयात कमी करणे आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळवून देणे या उद्दिष्टांसाठी महत्त्वाचे मानते. मात्र पर्यावरणपूरक धोरण राबविताना जर वाहनधारकांवर आर्थिक भार पडत असेल, वाहनांचे आयुष्य कमी होत असेल किंवा देखभालीचा खर्च वाढत असेल, तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार, हा प्रश्न आता अधिक ठळकपणे समोर आला आहे.

## राजकारणात नाही, पण सरकारवर दबाव कायम! 'कॉकरोच जनता पक्षाचा' झारखंडच्या विद्यार्थी आंदोलनाला उघड पाठिंबा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर । वृत्तसंस्था**

राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थी आंदोलनांमुळे चर्चेत आलेल्या कॉकरोच जनता पक्षाने सध्या निवडणुकीच्या राजकारणात उतरणार नसल्याचे स्पष्ट केले असले, तरी सरकारविरोधातील जनआंदोलनांना अधिक बळ देण्याची भूमिका जाहीर केली आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी झारखंडमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला उघड पाठिंबा जाहीर करत, आंदोलनकर्त्यांच्या मागण्या न्याय्य असल्याचे सांगितले आहे. तसेच पक्षाचे प्रतिनिधी लवकरच रांचीला जाऊन विद्यार्थ्यांशी एकजूट व्यक्त करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

झारखंडमध्ये राज्यभरातील विद्यार्थी भरती परीक्षांतील कथित अनियमितता, पारदर्शकतेचा अभाव आणि केंद्रीय यंत्रणेमार्फत चौकशी करण्याच्या मागणीसाठी आंदोलन करत आहेत. भरती प्रक्रिया पारदर्शक व्हावी आणि तरुणांना न्याय मिळावा, ही विद्यार्थ्यांची प्रमुख मागणी आहे.

अभिजीत दीपके यांनी सांगितले की, कॉकरोच जनता पक्ष सध्या निवडणूक राजकारणात उतरणार नाही. त्याऐवजी पक्ष जनतेचा दबावगट म्हणून काम करणार असून, जनतेच्या प्रश्नांवर सरकारला उत्तरदायी धरणे, आंदोलनांना पाठिंबा देणे आणि विविध सामाजिक विषयांवर आवाज उठवणे, हीच पक्षाची भूमिका असेल. यावेळी त्यांनी देशातील लोकशाही संस्थांबाबतही गंभीर चिंता व्यक्त केली. न्यायव्यवस्था, प्रसारमाध्यमे आणि निवडणूक आयोग यांसारख्या घटनात्मक संस्थांवरील जनतेचा विश्वास कमी होत चालला आहे, असा दावा त्यांनी केला.

# महागाई वाढतेय, पण RBI थांबलेच! सामान्यांच्या खिशावर प्रयोग की अर्थव्यवस्थेवर जुगार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) पुन्हा एकदा व्याजदरात कोणताही बदल न करण्याचा निर्णय घेतला आहे. रेपो दर सलग कायम ठेवत तो ५.२५ टक्क्यांवर स्थिर ठेवण्यात आला. महागाईचा दबाव वाढत असताना, जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती सातत्याने चढत असताना आणि अनेक आशियाई देशांनी व्याजदर वाढवून महागाईवर लगाम घालण्याचा प्रयत्न सुरू केला असताना, भारताने मात्र 'प्रतीक्षा आणि पाहू' ही भूमिका स्वीकारली आहे. त्यामुळे आता प्रश्न उपस्थित होतोठङ्ख योग्य वेळी योग्य निर्णय घेत आहे की परिस्थिती आणखी गंभीर होण्याची वाट पाहत आहे?

ठङ्ख चे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्पष्ट केले की, सध्या इंधनाच्या वाढलेल्या किमतीमुळे महागाईवर परिणाम होत असला तरी अर्थव्यवस्थेत व्यापक स्वरूपाचा महागाईचा दबाव अद्याप दिसत नाही. त्यामुळे व्याजदरात घाईघाईने बदल करण्याची गरज नसल्याचे त्यांनी सांगितले. सहा सदस्यीय चलनविषयक धोरण समितीने (MPC) एकमताने हा निर्णय घेतला आणि धोरणात्मक भूमिका देखील न्यूट्रल कायम ठेवली.

या निर्णयासोबत ठङ्ख ने चालू आर्थिक वर्षासाठी महागाईचा अंदाज ५.१ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. दुसरीकडे अर्थव्यवस्थेच्या वाढीबाबतचा अंदाज ६.६ टक्क्यांवरून ६.७ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. म्हणजेच ठङ्ख ला विश्वास आहे की भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अनिश्चिततेतही तुलनेने मजबूत राहील. मात्र हा आशावाद प्रत्यक्ष बाजारात आणि सामान्य नागरिकांच्या जीवनात कितपत दिसून येईल, हा मोठा प्रश्न आहे.




विशेष म्हणजे, इंडोनेशिया, फिलिपाइन्ससह अनेक आशियाई देशांनी वाढत्या तेलाच्या किमती आणि चलनावरील दबावामुळे व्याजदर वाढवण्याचा मार्ग स्वीकारला आहे. भारताने मात्र वेगळी भूमिका घेत, यापूर्वी परकीय भांडवल आकर्षित करण्यासाठी आणि रुपयाला आधार देण्यासाठी विविध उपाययोजना जाहीर केल्या होत्या. त्यामुळे ठङ्ख चा भर सध्या व्याजदरापेक्षा आर्थिक स्थैर्य आणि चलन व्यवस्थापनावर अधिक असल्याचे दिसून येते.

तथापि, सामान्य नागरिकांच्या दृष्टीने या निर्णयाचा अर्थ असा की गृहकर्ज, वाहनकर्ज किंवा उद्योगांसाठीच्या कर्जावरील व्याजदरात तातडीने कोणताही मोठा बदल होण्याची शक्यता कमी आहे. एचख मध्ये दिलासा मिळणार नाही, पण त्यात वाढही होणार नाही. मात्र जर जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती आणखी वाढल्या आणि त्याचा परिणाम अन्नधान्य, वाहतूक आणि इतर वस्तूंवर झाला, तर पुढील काही महिन्यांत ठङ्ख वर व्याजदर वाढवण्याचा दबाव निर्माण होऊ शकतो.

सध्या RBI ने सावधगिरीचा मार्ग निवडला आहे. पण अर्थव्यवस्थेत कधी कधी सर्वात मोठा धोका चुकीचा निर्णय नसतो, तर योग्य निर्णय घेण्यास झालेला उशीर असतो. महागाई आणि विकास यामधील समतोल राखण्याचे आव्हान आता अधिक कठीण झाले असून, पुढील चलनविषयक धोरण बैठकीकडे उद्योग, गुंतवणूकदार आणि सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.